10·7 दै पुण्यनगरी ①

अरुण जेटली यांना केली आहे. जीएसटी लागू ... आहे. या गोष्टी जीएसटी कमी लागण्यासाठी ... अरुण जेटली ... तुम्हाला ▮पान २ वर | करण्यात आलेल्या

# ओबीसी महिलेसाठी एका जागेची आज फेरसोडत

# इच्छुकांचा जीव टांगणीला!



नांदेड,दि.९: महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी झालेल्या सोडतीत ओबीसी महिलांच्या आरक्षणात गोंधळ झाल्याने उद्या सोमवारी (दि.१०) सकाळी ११ वाजता शंकरराव चव्हाण प्रेक्षागृहात या प्रवर्गासाठी पुन्हा नव्याने सोडत काढली जाणार आहे. या फेरआरक्षणाचे इतर प्रभागातील काही जागांवर परिणाम होतात का? याची चिंता इतर इच्छुकांनाही लागली आहे.

गेल्या गुरुवारी (दि.६) हनुमानगड प्रभागातील क जागा ही ओबीसी महिलेसाठी थेट देणे आवश्यक असताना ती जागा ओबीसीसाठी राखीव केल्यामुळे राज्य निवडणूक आयोगाने या प्रक्रियेवर ताशेरे ओढून ज्या दहा जागांवर ओबीसी महिलांचे आरक्षण थेट नेमून द्यायचे आहे, याची यादीच मनपा आयुक्तांकडे शुक्रवारी (दि.७) पाठवली. त्याचबरोबर ११ व्या जागेसाठी उर्वरीत दहा प्रभागातील ११ जागेपैकी एक जागा सोडत काढून आरक्षित करण्याच्या सूचना केल्या. त्यानुसार सोमवारी ओबीसी महिलेच्या एका जागेसाठी पुन्हा सोडत काढली जात आहे.

### अशी होणार आजची सोडत

हनुमानगड या एकमेव प्रभागातील ओबीसीला दिलेली जागा क ही थेट ओबीसी महिलेसाठी आरक्षित केली जाईल आणि सोडतीत ज्या प्रभागाची चिठ्ठी निघेल, त्या जागेवर ओबीसीची जागा स्थलांतरीत केली जाईल.

तक्ता क्रमांक १

**ओबीसी महिलेसाठी थेट राखीव होणाऱ्या दहा जागा**

| प्रभागाचे नाव | जागा |
|---|---|
| तरोडा खुर्द | १-ब |
| तरोडा बुद्रुक | २-ब |
| सांगवी | ३-ब |
| हनुमानगड | ४-क |
| भाग्यनगर | ५-ब |
| शिवाजीनगर | ८-ब |
| दत्तनगर | १०-ब |
| हैदरबाग | ११-ब |
| वसरणी-कौठा | १९-क |
| सिडको-वाघाळा | २०-क |

तक्ता क्रमांक २

**११ व्या एका जागेसाठी ओबीसी महिला सोडत**

| प्रभागाचे नाव | जागा |
|---|---|
| गणेशनगर | ६-ब |
| श्रावस्तीनगर | ७-ब |
| नवामोंढा | ९-ब |
| उमर कॉलनी | १२-अ |
| चौफाळा | १३-ब |
| होळी | १४-अ |
| इतवारा | १५-ब |
| गाडीपुरा | १६-अ |
| वजीराबाद | १७-अ |
| खडकपुरा | १८-ब |
| सिडको-वाघाळा | २०-ब |

▪ ओबीसीच्या या जागेत कोणताही बदल नाही (हैदरबाग/११-अ)

### नेमके कुठे अडले?

गुरुवारी (दि.६) झालेल्या सोडतीत हनुमानगड वगळता इतर जागा ओबीसी महिलांसाठी आरक्षित झाल्या होत्या. त्यातील काही जागा ओबीसी महिलांसाठी थेट देण्यात आल्या, तर उर्वरीत जागांसाठी दोन टप्प्यात सोडत काढण्यात आली. या निकषात चूक झाल्यामुळे आरक्षण चुकल्याचे समोर आले आहे.
▮पान २ वर

### हनुमानगडाच्या महिला जागेसाठी 'कसरत'

हनुमानगड हा प्रभाग चार सदस्यीय आहे. नव्या सोडतीत या प्रभागात ओबीसी महिलेची जागा थेट दिल्यामुळे इथे आधीच आरक्षित झालेल्या अनुसुचित जमाती महिला व सर्वसाधारण महिला या दोन महिलांच्या जागेत तिसऱ्या जागेची भर पडून प्रभागातील महिलांचे आरक्षण ५० टक्क्यांपेक्षा ▮पान २ वर